# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः03.10.2024** **वारःगुरुवार**

---

1. देशात रस्ते बांधणीत 80 लाख टन कचऱ्याचा वापर
2. शारदीय नवरात्रोत्सवाला आजपासून प्रारंभ.
3. बदलापूर प्रकरणातील भूमीगत आरोपी उदय कोतवाल आणि तुषार आपटे यांना अटक. आणि
4. खो -खो या खेळाची पहिली विश्वचषक स्पर्धा भारतात

**कचरा रस्ता**

रस्ते बनवताना काचऱ्याचा वापर केला जात असल्यानं कचऱ्याची विल्हेवाट लागून स्वच्छता अभियानाला हातभार लागत असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल नागपूर इथं सांगितलं. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित एका श्रमदान कार्यक्रमात ते बोलत होते. दिल्ली -मुंबई, ढोलेरा - अहमदाबाद तसंच इतर राष्ट्रीय महामार्गाच्या बांधणीमध्ये कचऱ्याचं विलगीकरण करून त्याचा वापर रस्ते बांधताना करण्याच्या सूचना कंत्राटदारांना देण्यात आल्या आहेत. आतापर्यंत 80 लाख टन कचऱ्याचा वापर रस्ते बांधणीत करण्यात आला असल्याची माहिती गडकरी यांनी यावेळी दिली.

**गांधी-शास्त्री**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त देशभरात काल विविध ठिकाणी त्यांना आदरांजली वाहण्यात आली. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी वर्धा मधल्या सेवाग्राम इथल्या महात्मा गांधीं यांच्या आश्रमाला भेट दिली. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांना अभिवादन केलं. राज्यात रत्नागिरी, धुळे, परभणी, नागपूर, पुणे आदि जिल्ह्यात विविध ठिकाणी महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचं पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आलं.

**स्वच्छता**

महात्मा गांधी जयंतीनिमित्त काल राज्यात सर्वत्र स्वच्छता दिवस साजरा करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या स्वच्छ भारत अभियानाला काल 10 वर्ष पूर्ण झाली. स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी असून यासाठी प्रत्येकानं कार्यरत राहिलं पाहिजे. स्वच्छतेच्या उपक्रमांना चालना मिळावी, यासाठी स्वच्छ भारत अभियान राबविण्यात येत असून यामुळे स्वच्छता मित्रांना आत्मसन्मान मिळाला आहे. आधुनिकीकरणामुळं दररोज वेगवेगळ्या कचऱ्याच्या प्रकारात वाढ होत आहे. या कचऱ्याचं संकलन, पुर्नप्रक्रिया करणारे 5 हजार स्टार्टअप गेल्या दहा वर्षांत उभे राहिले असून आगामी दहा वर्षांत या क्षेत्रात 65 लाख नोकऱ्या उत्पन्न होतील, अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल दिली. दुसऱ्या टप्प्यातील अमृत योजनेतील सातारा पालिकेच्या पाणीपुरवठा योजनेच्या स्वयंचलन प्रकल्पाची तसंच नळजोडण्यांना स्मार्ट मीटर बसविण्याच्या कामाचा प्रारंभ मोदी यांच्या हस्ते दिल्लीमधून दूरस्थ पद्धतीनं करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

सिंधुदुर्गमध्ये घेण्यात आलेल्या 'स्वच्छ माझे आंगण' या स्पर्धेच्या विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. धुळे जिल्ह्यात महाश्रमदान करण्यात आलं. सांगली ,मिरज आणि कुपवाड पालघर, परभणी, अहमदनगर आदि ठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. पुण्यात स्वच्छता कर्मचारी आणि संस्थांचा केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते सन्मान

करण्यात आला. पुणे शहरामध्ये राबवण्यात आलेल्या विशेष स्वच्छता मोहिमेत 79 टन सुका कचरा, 39 टन ओला कचरा आणि 351 टन राडारोडा गोळा करण्यात आला.

**घटस्थापना**

शारदीय नवरात्रोत्सवाला आजपासून प्रारंभ होत असून त्यानिमित्त बाजारपेठा सजल्या आहेत. नवरात्रीच्या नऊ दिवसात देवीची नऊ रुपांमध्ये पूजा केली जाते. सजावटीसह लागणारं साहित्य, मातीचे घट, झेंडूची फुलं यांच्या खरेदीसाठी सर्व बाजारपेठांमध्ये गर्दी दिसून येत आहे. घरगुती तसंच सार्वजनिक मंडळांमध्ये देवीच्या प्रतिष्ठापनेची तयारी मोठ्या उत्साहात सुरु आहे. कोल्हापूर करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीच्या मंदिरात सकाळी साडेआठ वाजता घटस्थापना केली जाणार आहे. तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्र महोत्सवाची सुरुवात घटस्थापनेनं होत आहे. तत्पूर्वी आज पहाटे देवीची मंचकी निद्रा संपून सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली. या नवरात्र महोत्सवात विविध अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहेत. साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्धपीठ असलेल्या वणी इथल्या श्री सप्तशृंगी देवी देवीच्या मंदिरात आज पहाटे देवीची महापूजा करण्यात आली आणि नवरात्र उत्सवाचा आरंभ झाला. श्री क्षेत्र माहूर इथं देशभरातील भाविक नवरात्रात दर्शनासाठी येतात. देवीला विविध नऊ रंगाचं पैठणी महावस्त्र घालण्यात येतं.

**टसर रेशीम-भंडारा**

भंडारा जिल्ह्यात टसर रेशीम उत्पादन हा एक पारंपरिक उद्योग आहे. ढिवर समाजातील लोक जंगलातील ऐन आणि अर्जुन या झाडांपासून टसर रेशीम तयार करून आपला उदरनिर्वाह करतात. या रेशीम उत्पादनामुळं अनेकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. याबद्दल रेशीम महिला कारागीर मनोरमा गणवीर आकाशवाणीशी बोलताना म्हणाल्या.....

**सहकार-पवार-सातारा**

सहकार हा विकासाचा पाया असून शेतकऱ्यांच्या विकासामध्ये सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचं योगदान मोठं असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल बॅंकेच्या अमृत महोत्सवी वर्ष सांगता कार्यक्रमात बोलताना सांगितलं. साखर कारखान्यांच्या एफआरपीप्रमाणे साखरेची एमएसपीही वाढविण्याचं आश्वासन केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी दिल्यामुळं ऊसाला चांगला दर देणं शक्य होणार असल्याचंही पवार यावेळी म्हणाले.

**वन्यजीव-रत्नागिरी**

वन्यजीव सप्ताहाच्या निमित्तानं रत्नागिरी जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यातला पहिला कार्यक्रम काल देवराई भ्रमंतीच्या रूपानं पार पडला. या भ्रमंतीमध्ये युवा पक्षीअभ्यासक विराज आठल्ये यांनी पक्ष्यांसह जैवविविधतेचं दर्शन घडवलं. रत्नागिरी परिसरात वेगवेगळ्या प्रकारचे अधिवास असल्याने साडेतीनशे प्रजातींचे पक्षी आढळत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**बदलापूर-ठाणे**

बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी, संबंधित शाळा संस्थेचा अध्यक्ष उदय कोतवाल आणि सचिव तुषार आपटे यांना ठाणे गुन्हे शाखेच्या उल्हासनगर पथकानं कर्जत भागातून अटक केली. 16 ऑगस्टला गुन्हा दाखल झाल्यापासून हे दोघे भूमीगत होते. त्यांचा अटकपूर्व जामीनही फेटाळ्यात आला होता, त्यांना अजून अटक का केली जात नाही असा प्रश्न मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयानं केला होता. कोतवाल आणि आपटे यांनी हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केल्याचाही त्यांच्यावर आरोप आहे.

**बुडून मृत्यू-धुळे**

धुळे जिल्हयातील शिंदखेडा तालुक्यातील सोनेवाडी गावात काल तापी नदीवर गेलेल्या दोन भावंडांचा बुडून मृत्यू झाला. एका धार्मिक विधीसाठी ते तापी नदी काठावर गेलं असता दोघेही नदीपात्रात उतरले. मात्र एकजण बुडू लागल्यानं दुसऱ्यानं वाचवण्यासाठी प्रयत्न केला मात्र दोघेही जण बुडाले.

**<u>निधन-धाराशिव</u>**

धाराशिव जिल्ह्यातील परंडा इथले शिवसेनेचे माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांचं दीर्घ आजारानं पुण्यातील खासगी इस्पीतळात काल रात्री निधन झालं. ते एकोणसाठ वर्षांचे होते. त्यांनी दोन वेळेस परंडा विधानसभा जागेचं प्रतिनिधित्व केलं होतं.

**<u>महिला-क्रिकेट</u>**

महिलांच्या आयसीसी टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेला आजपासून शारजा इथं सुरुवात होत आहे. बांग्लादेश आणि प्रथमच खेळणारा स्कॉटलंड यांच्या उद्घाटनाचा सामना होईल. भारताचा पहिला सामना उद्या न्यूझीलंडसोबत होणार आहे. येत्या 20 तारखेपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत दहा संघ उतरले आहेत. ऑस्ट्रेलियांच्या महिलांनी या स्पर्धेत मागील तिनही वेळा विजेतेपद मिळवलं असून भारतीय संघाला अद्याप एकदाही विजेतेपद मिळालेलं नाही. मुख्य स्पर्धेपूर्वी झालेल्या सराव सामन्यांमध्ये भारतीय महिलांनी दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीज यांना पराभूत केलं.

**<u>खो-खो विश्वचषक</u>**

खो -खो या देशी खेळाची पहिली विश्वचषक स्पर्धा पुढच्या वर्षी भारतात होणार आहे. भारतीय खो- खो महासंघ आणि आंतरराष्ट्रीय खो- खो महासंघानं काल ही माहिती दिली. या स्पर्धेत 6 खंडातले 24 देशांतले 16 पुरुष संघ आणि तितकेच महिला संघ सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा आठवडाभर चालेल. या स्पर्धेमुळे या खेळाला असलेल्या समृद्ध वारशाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जाणार आहे. आधी मातीत खेळला जाणारा हा खेळ आता मॅटवर खेळला जातो.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं हे प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.